# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

---

जळगाव दि. २२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ उद्या मंगळवारपासून नॅक पुनर्मूल्यांकनाला सामोरे जात असून दि. २३ ते २५ ऑगस्ट दरम्यान नॅक समिती विद्यापीठाला भेट देणार आहे. त्यासाठी विद्यापीठ प्रशासन आणि प्रशाळा यांची जय्यत पूर्ण तयारी झाली आहे.

पुनर्मूल्यांकनाच्या चौथ्या साखळीला विद्यापीठ सामोरे जात आहे. सन २००१ मध्ये विद्यापीठाला नॅककडून चार स्टार, सन २००९ मध्ये बी ग्रेड (2.88 CGPA) प्राप्त झाली. सन २०१५ मध्ये तिसऱ्या साखळीत अे ग्रेड (3.11 CGPA) प्राप्त झाली. आता चौथी साखळी आहे. नॅकच्या या पुनर्मूल्यांकनासाठी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली तयारी पूर्ण झाली आहे.

जानेवारी २०२२ मध्ये विद्यापीठाने नॅककडे सादर केलेल्या स्वयंमूल्यांकन अहवालाच्या आधारे नॅकद्वारे विद्यापीठाचे ७०% मूल्यमापन झालेले असून ३०% गुणवत्ता आधारीत मूल्यमापनासाठी नॅक समिती विद्यापीठाला प्रत्यक्ष भेट देत आहे. प्रशाळा आणि प्रशासकीय विभागांना ही समिती भेट देईल. उद्या सकाळी ९ वाजता समिती विद्यापीठात येईल.

विद्यापीठाने गेल्या पाच वर्षात संशोधन, शैक्षणिक विकास यामध्ये आघाडी घेतलेली असून अनेक संस्था व विद्यापीठांची सामंजस्य करार केले आहेत. अभ्यासक्रमात नवे बदल, परीक्षा पध्दतीतील काही नवे प्रयोग, विद्यार्थी केंद्रबिंदू मानून राबविल्या जाणाऱ्या योजना, विद्यापीठातील पायाभूत सुविधा यामुळे विद्यापीठाची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यात आत्मविश्वास वाढीला लागला असून नॅकला सामोर जाण्यास सर्व घटक सज्ज झाले आहेत.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २२ ऑगस्ट, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी